**अक्कलकाढा**

Botanical name - ***Spilanthes acmella*** (L.) L. Family – **Asteraceae**



**विविध भाषांमधील नावे: मराठी: अक्कलकाढा, अक्कलकारा; संस्कृत: अकल; हिंदी: अकलकरहा; इंग्लिश:** Panicled Spot Flower

**Morphology:**

An erect, branched, annual herb which reaches a height of 15 to 60 centimeters. Leaves opposite, petiolate, smooth or nearly so, ovate or ovate-lanceolate, with pointed tip and wedge-shaped base, and with toothed or wavy margins. Heads in axillary and terminal panicles; Involucral bracts 2-seriate; Ray florets few, in conspicuous; Disc florets companulate, Achenes dorsally compressed, oblong, dark-brown to black and enclosed separately in scales.

**वनस्पतीचे वर्णन:**

अक्कलकाढयाचे रोपटे वर्षायू, गोल दांडयाचे, गुळगुळीत फांद्याचे असते. त्याला अनेक पसरट फांद्या असतात. पाने साधी, समोरासमोर, देठाची, लांबट, हृदयाकृती, तीन मुख्य शिरांची असतात. फुले लांब देठावरती पिवळ्या गुच्छामध्ये येतात. फळे अंडाकार त्रिकोणी, टोकाला चपटी, केसाळ असतात.

**बहर येण्याचा कालावधी**: फुले नोव्हेंबर ते डिसेंबर येतात

**औषधी उपयोग**: अक्कलकाढयाचे बोंड चघळल्यास तोंडास लाळ सुटते. अक्कलकाढयाचे मूळ वातहर, वेदनास्थापक व बल देणारे आहे. अक्कलकाढयाचे चूर्ण किडलेल्या दातापासून होणाऱ्या वेदनांपासून मुक्तता देते. जीभ व घसा यांच्या दुखण्यामध्ये, आवाज मोकळा करण्यास व लाळ सुटण्यास मुळाचा तुकडा तोंडात धरतात. पोटदुखी, पोटशूळ, मुरडा येणे, अर्धांगवायू, मज्जातंतूंच्या आजार, स्मृतिभ्रंश यांसारख्या व्याधींमध्ये याचा वापर करतात. कफ व वातप्रधान रोगात व दातदुखीमध्ये याचा वापर करतात.
लागवड व पद्धत: अक्कलकाऱ्याची लागवड पावसाळ्यात उगवलेल्या रोपांपासून किंवा बियांपासून केली जाते. लागवड करताना २ x ४ x ४ च्या खाड्यांमध्ये शेणखत घालून त्यामध्ये रोपे लावावीत. पावसाळ्यात लावलेल्या रोपण हिवाळ्यात फुले येतात. याची लागवड मुख्यत्वे फुले व बियांसाठी केली जाते. फुले व बिया वेगवेगळी वाळवून साठवली जातात.

**लागवड**:

याची लागवड इनडोअर प्लांट म्हणून सुद्धा करता येते. बिया लहान कुंडी किंवा कप्स मध्ये अथवा ट्रे मध्ये लावला जातात. याला नियमितपणे पाण्याची गरज असते. याची वाढ मध्यम सूर्यप्रकाशात चांगली होते. ट्रे मधील रोपे जमिनीमध्ये लावता येतात.